दै. लोकमत दि. 05/11/20

धक्कादायक...

# चूक हेरली अन् हत्यारांना घेरले

## सरख्वा भाऊच निघाला पक्का वैरी




हदगाव तालुक्याच्या राजकारणात दबदबा असणाऱ्या एका प्रसिद्ध घराला त्यांच्या कर्मामुळे कुलूप लागले. बाप-लेकाने कट रचून भावाला जिवे मारले व अपघात असल्याचे दाखवित तो मी नव्हेच, अशा तोऱ्यात फिरू लागले. पण पोलिसांनी अतिशय बारकाईने तपास करीत आरोपींना अटक केली. हा अपघात नसून खून असल्याचे उघड केले.

**- सुनील चौरे,** हदगाव



संतोष शेकडे
सपोनि. मनाठा

२ जून रोजी सकाळी काही लोक मॉर्निंग वॉकला जात असताना अचानक भरवेगात एक कार गावाच्या दिशेने येते. शिकार बघत परत येऊन पती-पत्नी व एक मित्र मागेपुढे असताना त्यापैकी एकालाच उडवून आल्या दिशेने परत वेगाने निघून जाते. हा थरार काही मिनिटांत होतो. बघणारे सुन्न झाले. सोबतच्या पत्नीलाही पती कुठे गेले कळत नाही. रस्त्याच्या खाली नालीत ते मरणासन्न अवस्थेत पडलेले असतात. त्या वाहनाला पकडण्यासाठी पोलिसांची धावपळ सुरू होते. पण हाती काहीच लागत नाही.

मयत हे गावच्या सरपंच बाईंचे ते सासरे उत्तमराव नागोराव शिंदे असतात. आरोपी आपले काम करून पुन्हा काहीच घडले नाही असे दाखवित रुग्णालयात हजर होतात; परंतु मयताचा मुलगा विशाल शिंदे हा आपल्या काकावर व चुलत भावावर खुनाचा आरोप करतो. मनाठा पोलिस ठाण्यामध्ये तशी तक्रारही करतो, पण कोणीच त्याच्यावर भरोसा करीत नाही. पोलिस अधिकारी सुद्धा तक्रार घेण्यास नकार देतात. राजकीय पुढारी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करतात. तुमच्या संस्थेची भांडणे आहेत. कौटुंबिक वाद अनेक वर्षांपासून सुरू आहे; पण मारोतराव शिंदे व त्याची शिकलेली पोरं, असं कृत्य करणार नाहीत, असे सांगतात.

### अन् एक पुरावा हाती लागला

फिर्यादी हा खुनाचा गुन्हा दाखल झाल्याशिवाय मी मृतदेह ताब्यात घेणार नाही, असे ठणकावतो. मग पोलिस तपास सुरु करतात. घटनास्थळी गाडीचे काही तुटलेले भाग सापडतात. तोच एक पुरावा पोलिसांकडे असतो. गाडी नंबर नाही, गाडीने उडविले की अपघात झाला, या अनुषंगाने तपास सुरु होतो. अपघात असता तर लायनिंग मार्क, म्हणजे ब्रेक मारल्याच्या खुना घटनास्थळी नव्हत्या. एक पुरावा मिळाला, त्यानंतर वाहन गावाच्या दिशेने वेगात आले व पुन्हा त्याच वेगात परत गेले, हे एका वाईनशॉपीच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाले. त्यानंतर ८०/९० किमी अंतरावरील सर्व फुटेज तपासले.

### भक्कम पुरावे

मी एटीएसमध्ये होतो. पहिल्यादांच ठाण्याचा कारभार घेतला व तपास समोर आला. एकही पुरावा हाती नसतानाही कलम ३०२ व १० ब दाखल केला. पण कोर्टात तर पुरावे हवे असतात. मग तपासात पुरावे मिळत गेले. एक महिन्यानंतर आरोपी सुटणार नाहीत, एवढे भक्कम पुरावे जमा केले. कधी न विसरणारा हा तपास होता.

**-संतोष शेकडे,** सहायक पोलिस निरीक्षक, मनाठा

### किचकट गुन्ह्याचा लावला छडा

आरोपी प्रतिष्ठित असल्याने व राजकीय पुढारी मदतीला होतेच. अटकपूर्व जामीन मागितला; पण पोलिसांनी केलेल्या कामगिरीमुळे त्यांना जामीन नाकारला.

सुप्रीम कोर्टापर्यंत आरोपी गेले. पण पोलिसांच्या तपासामुळे व पुराव्यामुळे त्यांना जामीन नाकारला. मग एका आरोपीला अटक केली. त्याने गुन्हा कबूल केला. तरीही ३ आरोपी अद्याप फरार आहेत. पण पोलिसांनी किचकट गुन्ह्याचा तपास मात्र जिवाची बाजी लावून केला. खून करुन अपघात असल्याचे सिद्ध करणाऱ्या आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.